<u>सं. फौ. ख. क्र.८५९/२०२१</u> निशाणी १९

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र.३ यांचा शपथेवर जबाब</u>**
**<u>मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की,</u>**

नाव – सचिन रायभान माळी

वय – ४२ वर्षे, व्यवसाय – शेती

पत्ता – रा. बाकराबाद, ता. जि. अकोला.

**<u>सरकारतर्फे सरकारी वकिल श्री. एच. ए. जुनारे यांचे मार्फत सरतपास सुरुः</u>**

१. रायभान माळी हे माझी वडील होते. दि.२७.०१.२०२१ रोजी सकाळी १० वा. सुमारास मी माझ्या बाकराबाद बसस्टॉपजवळील असलेल्या गावठानच्या येथील गोठ्यामध्ये होतो. त्यावेळी नितीन भाकरे त्याच्या ताब्यातील टाटा ए. एस. गाडी क्र. एमएच३०–एबी–०५९४ ही बसस्टॉपच्या समोरील रस्त्यावरुन रिव्हर्स घेतली. त्यावेळी तेथे लोकांचा आरडाओरडा झाला त्यामुळे मी तेथे पळत गेलो. त्यावेळी माझे वडील सदर गाडीच्या पाठीमागील बाजूस दोन्ही चाकाच्या मध्ये जखमी अवस्थेमध्ये मला दिसून आले. ते जाग्यावरच मयत झाले. माझ्या वडीलांच्या मृत्युस सदर गाडीचा चालक नितीन भाकरे जबाबदार आहे, कारण मी त्यास तेथे पाहिले होते. मी आरोपीस ओळखतो, कारण तो पुर्वी ट्रॅक्टर चालवित होतो व तो माझ्या शेतात देखील ट्रॅक्टर घेऊन आला होता.

२. सदर घटनेची फिर्यादी मी उरळ पो.स्टे. येथे आरोपी विरुध्द दिली त्यावरुन पोलीसांनी आरोपी विरुध्द गुन्हा दाखल केला. आता मला सदरचा फिर्यादी जबाब दाखविण्यात आला त्यावर माझी सही असून त्यातील संपुर्ण मजकूर माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२०** देण्यात येत आहे. आता मला छापील प्रथम खबरी अहवाल दाखविण्यात आला त्यावर माझी सही असून त्यातील संपुर्ण मजकूर माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२१** देण्यात येत आहे. पोलीसांना सदर अपघातस्थळ मी दाखविले होते. पोलीसांनी सदर गुन्ह्याबाबत माझी चौकशी गुन्हा नोंद केल्यानंतर केली नाही. आरोपीस मी पाहिल्यास मी ओळखू शकतो. आरोपी आज न्यायालयात असल्याबाबत साक्षीदार यांनी ओळखले.

सरतपास पूर्ण.

**<u>आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एन. एन. जामोदे यांच्या मार्फत उलटतपासः</u>**

३. मी माझा जबाब पोलीसांना देतेवेळी ''दि.२७.०१.२०२१ रोजी सकाळी १० वा. सुमारास मी माझ्या बाकराबाद बसस्टॉपजवळील असलेल्या गावठानच्या येथील गोठ्यामध्ये होतो'' हा मजकूर माझ्या जबाबामध्ये मी पोलीसांना सांगितला होता तसेच बसस्टॉपच्या समोरील रस्त्यावरुन रिव्हर्स घेतली त्याचप्रमाणे त्यावेळी तेथे लोकांचा आरडाओरडा झाला त्यामुळे मी तेथे पळत गेलो हा मजकूर पोलीसांना सांगितला होता, परंतु सदर मजकूर माझ्या रिपोर्ट व बयाणामध्ये का नाही, याचे कारण मी सांगू शकत नाही.

४. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलांचे वय ८२ वर्षे होते व ते वयस्कर होते तसेच त्यांना डोळयांनी दिसत नव्हते व ते रस्त्याने डोक्यावर पडल्यामुळे ते मयत झाले. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या सरतपासामध्ये सांगितलेली कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला सदर घटनेबाबत काही माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हा माझ्या गावातील असल्याकारणाने मी त्यास ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीविरुध्द खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.
फेरतपास नाही.

**दिनांकः– २३.०७.२०२५**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

DAYANAND MARUTI WAGHMARE
Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE
Date: 2025.07.23 14:45:18 +0530

**(डी. एम. वाघमारे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.२), बाळापूर.**

<u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :– | **श्री. दयानंद एम. वाघमारे,** सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :– | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :– | २३/०७/२०२५ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :– | २३/०७/२०२५ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :– | २३/०७/२०२५ |